**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी घेणे, निष्कर्ष प्रसिध्द करण्याबाबतचे निर्बंध...**

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र


**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक- रानिआ/ मनपा/२०१२/प्र.क्र.१३/का.५

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२


दिनांक - २/०२/२०१२

# आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील २७ जिल्हा परिषदा आणि ३०९ पंचायत समित्यांसाठी **दिनांक- ७ आणि १२ फेब्रुवारी, २०१२ रोजी** मतदान होत आहे. तर १० महानगरपालिकांसाठी **दिनांक- १६ फेब्रुवारी, २०१२ रोजी** मतदान होत आहे.

आणि ज्याअर्थी, दोन्ही निवडणुका पाठोपाठ असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर जनमत चाचणी अथवा मतदानोत्तर चाचणी प्रसार माध्यमांनी घेतल्यास अथवा जिल्हा परिषदेच्या निकालाचे अंदाज त्यांनी केलेल्या चाचणीवरून प्रसिध्द केल्यास त्याचा महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पडू शकतो.

त्याअर्थी, अशा जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणी घेण्यावर राज्य निवडणूक आयोग बंदी घालत आहे. इलेक्ट्रॉनिक किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या माध्यमांना मतदान समाप्तीपूर्वी जनमत चाचणीचे निष्कर्ष (**Opinion Poll**) प्रसिध्द करता येणार नाहीत. **महानगरपालिकेच्या मतदान समाप्तीनंतर Exit Poll** म्हणजेच मतदानोत्तर चाचणीचे निष्कर्ष प्रसिध्द करता येतील. तत्पूर्वी असे कुठलेही निष्कर्ष वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहिती पत्रके, फलक किंवा तत्सम प्रसिध्दी, खाजगी किंवा सरकारी रेडिओ, टी.व्ही. केबल, डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टी.व्ही. सॅटेलाईट, एसएमएस, इंटरनेट, फेस बुक आणि तत्सम उपलब्ध साधने याद्वारे प्रसिध्द करता येणार नाहीत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. अशोक कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र